# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १४.०१.२०२५**

**जिल्हा : सातारा**

| मागील आठवड्यातील हवामान (०८.०१.२०२५ ते १४.०१.२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१५.०१.२०२५ ते १९.०१.२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०८ | ०९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | दिनांक | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | - | - | - | - | - |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | - | - | - | - | - |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | - | - | - | - | - |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | - | - | - | - | - |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | - | - | - | - | - |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | - | - | - | - | - |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | - | - | - | - | - |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | - | - | - | - | - |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार **सातारा** जिल्ह्यामध्ये दिनांक १५ ते १९ जानेवारी दरम्यान आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. **सातारा** जिल्ह्यामध्ये पुढील २ दिवस कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी तर त्यानंतर कमाल तापमानामध्ये थोडी वाढ होण्याची शक्यता आहे. पुढील ५ दिवसांमध्ये किमान तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता सरासरी दरम्यान तर दुपारची सापेक्ष आद्रता सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. पुढील ३ दिवस डोंगराळ भागांमध्ये काही ठिकाणी धुके पडण्याची शक्यता आहे |
| सामान्य सल्ला | | ➢ फळे तसेच भाजीपाला पिकांमध्ये जमिनीतून बाष्पिभवन कमी होऊन जमिनीमध्ये ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आच्छादनाचा वापर करावा.<br>➢ फळबागेतील तापमान नियंत्रित राहण्यासाठी फळबागांना शक्यतो रात्रीच्या वेळी पाणी द्यावे. |
| संदेश | | ➢ उशिरा पेरणी केलेल्या गहू क्षेत्रात तापमान कमी रहावे म्हणून गव्हासाठी तुषार सिंचनाचा वापर करावा. तुषारने शेवटचे पाणी ८० ते ८५ दिवसांदरम्यान दयावे. |
| गहू | फुलोरा | ➢ गहू पिकास पेरणीनंतर ६० ते ६५ दिवस झाले असल्यास फुलोरा अवस्थेत असताना पाणी द्यावे.<br>➢ मागील आठवड्यामध्ये ढगाळ हवामान राहिल्यामुळे गहू पिकावर मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी मेटारायझियम ॲनिसोप्ली किंवा व्हार्टीसिलीयम लेकॅनी १.१५ टक्के डब्ल्यू. पी. ४० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. |
| रब्बी ज्वारी | फुलोरा | ➢ बागायती ज्वारीमध्ये मध्यम जमिनीत तिसरे पाणी पिक फुलोऱ्यात असताना पेरणीनंतर ७० ते ७५ दिवसांनी आणि कणसात दाणे भरताना पेरणीनंतर ९० ते ९५ दिवसांनी द्यावे. |
| स्ट्रॉबेरी | वाढीची | ➢ लागवडीनंतर साधारणत: ८५ ते ९० दिवसांनी स्ट्रॉबेरी फळांची जातींच्या पक्कतेनुसार काढणी १ दिवसाआड करावी. साठवणुकीसाठी प्रिकुलिंग व कोल्डस्टोरेज तंत्रज्ञानाचा वापर करावा. प्रिकुलिंग मध्ये स्ट्रॉबेरी फळे ० ते ४ अंश सेल्सिअस तापमानात ४ तास थंड केली जातात त्यामुळे फळांचे आयुष्यमान दुप्पटीने वाढते.<br>➢ स्ट्रॉबेरी फळझाडांना जमिनीच्या मगदुरानुसार २ ते ३ दिवसाआड ठिबक सिंचनाद्वारे पाणी द्यावे. |
| ऊस | आडसाली ऊस | ➢ ऊस बांधणीच्या अवस्थेत असलेल्या आडसाली ऊसाला हेक्टरी १६० किलो नत्र (३४७ किलो युरिया) (७.७१ पोती), ८५ किलो स्फुरद (५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) (११.८ पोती) आणि ८५ किलो पालाश (१४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) (३.१६ पोती) खतमात्रा देऊन ऊस बांधणी करावी. को ८६०३२ या ऊस जातीसाठी २५% जास्त रासायनिक खतमात्रा वाढवून द्यावी. |
| डाळिंब | बहार : हस्त फुलधारणा आणि फळधारणा अवस्था | **कीड व्यवस्थापन:**<br>१. शोष किडींसाठी झाडाच्या शेंड्याच्या १५ सेमी खाली नागमोडी (झिक-झयाक) पद्धतीने पिवळे / निळे चिकट २५ ते ३० सापळे प्रती एकर प्रमाणे बांधावेत. किडींच्या प्रादुर्भावानुसार खाली नमूद केलेल्या फवारण्या घ्याव्यात.<br>२. **पहिली फवारणी:** स्पीनेटोरम १२% एस. सी. @ १.०. मिली प्रती लिटर किंवा स्पीनोसॅड ४५% एस. सी. @ ०.५ मिली प्रती लिटर + ०.२५ मिली प्रती लिटर स्प्रेडर स्टिकर मिसळून फवारणी करावी.<br>३. **दुसरी फवारणी:** पहिल्या फवारणीच्या ७ ते १० दिवसांनंतर स्पीनोसॅड ४५% एस. सी. (@) ०.५ मिली प्रती लिटर किंवा नीम तेल १% (१०००० पीपीएम) @ ३ मिली प्रती लिटर किंवा पोंगामिया (करंज बियांचे) तेल @ ३ मिली प्रती लिटर किंवा नीम तेल + पोंगामिया (करंज बियांचे) तेल प्रत्येकी ३ मिली प्रती लिटर ०.२५ मिली प्रती लिटर स्प्रेडर स्टिकर मिसळून याप्रमाणे फवारणी करावी.<br>४. **तिसरी फवारणी:** गरज वाटल्यास, स्पीनोटेरम १२% एस. सी. @ १.० मिली प्रती लिटर किंवा स्पीनोसॅड ४५% एस सी @ ०.५ मिली प्रती लिटर ०.२५ मिली प्रती लिटर स्प्रेडर स्टिकर याप्रमाणे फवारणी करावी. |
| आंबा | मोहोर | ➢ मागील आठवड्यामध्ये ढगाळ हवामान राहिल्यामुळे आंब्यावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी सल्फर ८०% डब्ल्यू.पी. २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |

# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| कांदा | कंद विकसित होणे | ➢ कांदा पिकावर काही ठिकाणी फुलकिडे या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. फुलकिड्यांची पिले आणि प्रौढ पाने खरवडतात आणि त्यातून बाहेर येणारा रस शोषतात. त्यामुळे पानांवर पांढरे चट्टे पडतात यालाच टाक्या असे संबोधतात. त्याच्या नियंत्रणासाठी<br>➢ डायमेथोएट ३०% ईसी १५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५% ई.सी. ६ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून साध्या हातपंपाने या किटकनाशकांच्या आलटुन पालटून फवारण्या कराव्यात.<br>➢ अधून मधून ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी.<br>➢ फवारणी करतांना चिकट द्रव्याचा (०.१%) वापर जरूर करावा. |
| हळद | पक्वता | ➢ हळद पिकाची काढणी जातीनुसार पिकाचा कालावधी पूर्ण झाल्यावर करावी. काढणीपुर्वी जमिनीच्या प्रतीनुसार १५ ते २० दिवस पाणी देणे बंद करावे. |
| वांगी | फुलोरा | ➢ मागील आठवड्यामध्ये कोरडे हवामान राहिल्यामुळे वांगी पिकावर कोळी या किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच फेनप्रोपॅथ्रीन ३०% ईसी ५ मिली. किंवा फेनॅक्झाक्विन १० टक्के ई.सी. २५ मिली १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| पशुधन | वाढीची | ➢ रात्री जनावरे गोठ्यात बांधावीत आणि त्यांना थंडीपासून बचावासाठी कोरडी उबदार जागा उपलब्ध करून द्यावी<br>➢ थंडीचा सामना करण्यासाठी व जनावरांना निरोगी ठेवण्यासाठी आहारात पुरेसे प्रथिने आणि खनिजे द्यावीत<br>➢ रात्रीच्या वेळी जनावरे / बकरीना उघड्यावर ठेवू नका. |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

ठिकाण : कोल्हापूर
दि. : १४.०१.२०२५

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**